क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/९२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१

दिनांक : ७ एप्रिल, १९९८

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १२ मार्च, १९९८ (गुरुवार) रोजी झालेल्या ९२ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

श्र.वि.आसगांवकर ७/४/९८

(श्र.वि.आसगांवकर)
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य,

निमंत्रित :

शासनाचे प्रधान सचिव (नवि-२)
नगर विकास विभाग,
मंत्रालय

प्रत अग्रेषित :

विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्रा.,

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## ९२ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १२ मार्च, १९९८ (गुरुवार) |
| वेळ | : | सायंकाळी ६.३० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्यमंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ |

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री.मनोहर जोशी<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.सुरेशदादा जैन<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री.रविंद्र माने<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.राज पुरोहित<br>गृहनिर्माण राज्यमंत्री | सदस्य |
| श्रीमती विशाखा राऊत<br>मुंबईच्या महापौर | सदस्या |
| सरदार तारासिंह एस्.नंद्रजोग<br>अध्यक्ष, स्थायी समिती<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.रा.ता.कदम<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री.दिगंबर द.कांडरकर<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.विजय म.दारुवाले<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.चंद्रकांत पडवळ<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.वसंत डावखरे<br>विधान परिषद सदस्य | सदस्य |
| श्री.पी.सुब्रह्मण्यम्<br>शासनाचे मुख्य सचिव | सदस्य |
| श्री.गिरीष गोखले<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.के.नलिनाक्षन<br>शासनाचे प्रधान सचिव (१)<br>नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री.विश्वास धुमाळ<br>व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको | सदस्य |
| श्री.व्ही.पी.राजा<br>शासनाचे सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री.क.चं.श्रीवास्तव<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

निमंत्रित :

श्री.नंद लाल
शासनाचे प्रधान सचिव (२)
नगर विकास विभाग

**बाब क्र. १ : दिनांक २३ जानेवारी, १९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या (९१ व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे**

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक २३ जानेवारी, १९९८ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ९१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल**

कार्यवाही अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

**बाब क्र.३ : मे.लार्सन ॲन्ड टुब्रो लिमिटेड कंपनीला नरीमन पॉईंट येथील भूखंड क्र.२४० व २४० ए हे बहुमजली वाहनतळ व व्यापारी केंद्र बांधण्यासाठी भाडेपट्टयाने देणे**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७६७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मेसर्स कॉलीयर आणि जार्डीन या सल्लागारांनी सादर केलेल्या अहवालाचा विचार करुन व प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने त्यांच्या

दि.२६ डिसेंबर, १९९७ च्या ठराव क्र.७४२ मध्ये केलेल्या शिफारशीनुसार आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये मिळालेल्या आणि याबाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मे.लार्सन ॲन्ड टुब्रो लि. यांनी नरीमन पॉईंट येथील भूखंड क्रमांक २४० व २४० ए यांच्या भाडेपट्टयासाठी सादर केलेला देकार याद्वारे स्वीकारत आहे व संदर्भित भूखंड मे.लार्सन ॲन्ड टुब्रो लि. यांना रु.२३ कोटी भाडेपट्टा अधिमूल्याने याबाबत निविदा पुस्तिकेत नमुद केलेल्या सुधारीत अटी व शर्ती तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मध्ये नमुद केलेल्या इतर अटी व शर्ती यांच्या अधीन राहून, ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास सूचविल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी, ज्या ज्या गोष्टी करणे जरुरीचे आहे ते करण्यासाठी, तसेच मे.लार्सन ॲन्ड टुब्रो लि. यांचेकडून योग्यवेळी प्राधिकरणाला २७५ वाहने ठेवण्याचा सुसज्ज वाहनतळ तसेच आणखी २००० चौरस मीटर परिबध्द जागेचा ताबा मिळविण्यासाठी आणि ४ थ्या वर्षाच्या अखेरीस रु.३.४५ कोटी रक्कम वाहनतळाच्या व व्यापारी केंद्राची परिरक्षा व सुधारणा यासाठी उभारावयाच्या निधीसाठी कबूल केल्याप्रमाणे मे.लार्सन अँड टुब्रो लि. यांचेकडून मिळविण्यासाठी सर्व कार्यवाही करण्यासाठी आणि सल्लागारानी सूचविलेली उपाययोजना करण्यासाठी, तसेच मे.लार्सन ॲन्ड टुब्रो लि. यांच्याबरोबर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारित) च्या नमुना "ड" प्रमाणे भाडेपट्टा विलेख करीत असताना त्यामध्ये योग्य ते बदल करण्यास व आणखी काही करार पत्रे वगैरे करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.४ : वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये बहुमजली वाहनतळ व हॉटेल बांधण्यासाठी भूखंड भाडेपट्टयाने देण्याबाबत**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करताना, शक्य असेल तर २ च्या ऐवजी ५ खोल्या संदर्भित भूखंडावर बांधण्यात येणा-या हॉटेलमध्ये प्राधिकरणासाठी मिळतील यासाठी प्रयत्न करावा अशी सूचना प्राधिकरणाने केली आणि त्याप्रमाणे खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७६८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मेसर्स रायजी अँड हॉवर्थ कन्सलटन्सी सर्व्हिसेस प्रायव्हेट लि. या सल्लागारांनी सादर केलेल्या अहवालाचा विचार करुन व प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने केलेल्या दि.१२ फेब्रुवारी, १९९८ च्या ठराव क्र.७४४ मध्ये केलेल्या शिफारशीनुसार आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे मे.इ.आय.एच.हॉटेल्स लि. यांचा १२१ कोटी रुपयांचा उच्चतम देकार स्वीकारीत आहे आणि वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमध्ये बहुमजली वाहनतळ व हॉटेल बांधण्यासाठी राखून ठेवलेला १५,००० चौ.मीटर क्षेत्रफळाचा भूखंड त्यांना निविदेतील सुधारीत अटी व शर्ती, तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत) नुसार ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने सूचविल्याप्रमाणे देण्यास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी ज्या ज्या गोष्टी करणे जरुरीचे आहे त्या करण्यासाठी, तसेच मे.इ.आय.एच्. हॉटेल्स लि. यांचेकडून प्राधिकरणाला एका स्वतंत्र इमारतीमध्ये ३०,००० चौरस मीटर परिबध्द क्षेत्र असलेले आंतरराष्ट्रीय दर्जाचे दोन तळघरासह कमीत कमी ८५० वाहने ठेवण्याची तरतूद असलेला व त्यामध्ये सहाय्यभूत

सुविधा असलेला वाहनतळ योग्यवेळी मिळविण्यासाठी, तसेच बाब टिप्पणीच्या परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या सुविधा/सवलती, ज्यामध्ये हॉटेल्समधील २ खोल्या कोणताही आकार, फी किंवा भाडे न आकारता प्राधिकरणाला किंवा प्राधिकरणाच्या नामनिर्देशितांना देणे याचा समावेश आहे, त्या मिळविण्यासाठी सर्व उपाययोजना करण्याचे व त्याच्या वापराच्याबाबतीत निर्णय घेण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत) मधील भाडेपट्टा विलेखाचा नमुना "डी" मध्ये आवश्यक ते बदल करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : पंजाब नॅशनल बँकेने दाखल केलेली रिट याचिका – वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रातील भूखंड क्र.सी-९ भाडेपट्टयाने देण्याबाबत**

या विषयावर झालेल्या चर्चेचा समारोप करताना, मा.अध्यक्षांनी याबाबतीत प्राधिकरणाने निविदाकारास त्यांच्या निविदेची रक्कम वाढविण्यास सांगणे तसेच नंतर ती रक्कम कमी करणे याबाबतीत कायदेशीररीत्या अधिकार आहेत किंवा कसे हे तपासून घेऊन त्यासाठी जरुर ती उपाययोजना करावी असे सूचविले. ती मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७६९ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) यानुसार प्रदान केलेल्या आणि याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन, तसेच प्राधिकरणाच्या दिनांक ३ मे, १९९५ रोजी झालेल्या बैठकीत मंजूर केलेल्या ठराव क्रमांक ६२५ मध्ये आवश्यक तेथे अंशतः बदल करुन, प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला

संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रातील भूखंड क्रमांक सी-९ चे वाटप पंजाब नॅशनल बँकेला करण्यास याद्वारे मंजूरी देत आहे. अधिमूल्याचा दर सदर बँकेने दर्शविलेल्या देकाराप्रमाणे म्हणजे रुपये ७९,२५०/- प्रति चौरस मीटर परिबध्द क्षेत्र असा असेल आणि त्यावर कोणत्याही प्रकारे व्याजाची आकारणी करण्याची नाही. भाडेपट्टा कराराची मुदत ८० वर्षांची असून त्याच्या अटी व शर्ती निविदा पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे व अन्य नेहमीच्या अटी व शर्ती रहातील. परंतु हा देकार पंजाब नॅशनल बँकेने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका मागे घेण्याची शिवाय याचिकेसाठी व विलंबासाठी कोणतीही भरपाई इत्यादि न मागण्याचा अटींच्या तसेच त्यांनी निविदा सादर करताना अस्तित्वात असलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ च्या तरतुदीनुसार भाडेपट्टा अधिमुल्याची रक्कम भरण्याच्या अधीन आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, ह्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी जरुर असलेले सर्व उपाय योजण्यासाठी, तसेच आवश्यकता भासल्यास संदर्भित निविदा सादर करतेवेळी अस्तित्वात असलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील भाडेपट्टयाचा करार (नमुना `डी`) आणि भाडेपट्टा विलेख (नमुना `ई`) मध्ये आवश्यक ते फेरबदल करण्यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : वांद्रे-कुर्ला जोडमार्गावर मिठी नदीवर पूल बांधणे – कुर्ल्याच्या बाजूचे पोचमार्ग बांधण्यासाठी आवश्यक असलेली जमीन वाटाघाटी द्वारे घेण्याचा प्रस्ताव**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७७० :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने त्यांच्या दि. १२ फेब्रुवारी, १९९८ च्या ठराव क्र.७४८ मध्ये केलेल्या शिफारशीनुसार, प्राधिकरण याद्वारे खालील कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे :-

भूमापन क्र.३१७, सी.टी.एस्.क्र.१४६ येथील ८१९.३ चौरस मीटर क्षेत्रफळाची श्री.अब्दुल हफिज खैरुल्हा कुरेशी (पत्रावाला) यांची जमीन वाटाघाटीद्वारे ताब्यात घेणे आणि वांद्रे-कुर्ला संकुलाच्या जवळपासच्या भागात म्हणजे कोलेकल्याण गाव, तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा, यामधील भूमापन क्र.१७४, हिस्सा क्र.६, सी.टी.एस्.क्र.७२१६ येथील ०-१५-०८ एकर आणि भूमापन क्र.१७४, हिस्सा क्र.७, सी.टी.एस्.क्र.७२१७ येथील ०-१३-०४ एकर यापैकी त्यांच्या (श्री.कुरेशी) जमिनीएवढी जमीन त्यांना देऊ करणे, तसेच श्री.कुरेशी यांच्या सध्याच्या बांधकामासाठी वाजवी नुकसान भरपाई देणे, किंवा त्याऐवजी प्लॉटच्या चारहीबाजूला संरक्षक भिंत बांधून देणे, मात्र श्री.कुरेशी यांना दिलेल्या जागेवर फक्त एक चटईक्षेत्र

निर्देशांक वापरता येईल व या जागेवरील उर्वरित चटईक्षेत्राचा वापर ज्यावेळी त्यासंबंधीचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल त्यावेळी असलेल्या बाजारभावाप्रमाणे अधिमूल्य भरल्यानंतरच श्री.कुरेशी करु शकतील.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, मंजूर विकास प्रस्तावातील वापरापेक्षा इतर वापरासाठी श्री.कुरेशी यांना बदलून द्यावयाच्या जमिनीचा वापर बदलणे आवश्यक असल्यास त्याबाबत सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, श्री.कुरेशी यांच्याशी वाटाघाटी करण्यास आणि करार करुन घेण्यास मुंबई उपनगर जिल्हाधिका-यांमार्फत चालू असलेली भूमि संपादनाची कार्यवाही व त्या कराराप्रमाणे अंतिम करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ७ :** **वैश्य बँक मर्यादित आणि ग्लोबल ट्रस्ट बँक मर्यादित यांना वांद्रे-कुर्ला संकुलात अनुक्रमे सी-१२ व सी-२९ हे व्यापारी वापराचे भूखंड देण्याबाबत**

चर्चेनंतर, या विषयाचा सखोल अभ्यास करुन प्राधिकरणास अहवाल सादर करण्यासाठी एका समितीची नियुक्ती करणारा खालील ठराव प्राधिकरणाने मंजूर केला :-

ठराव क्र.७७१ :-

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ९ चा वापर करुन, वैश्य बँक मर्यादित आणि ग्लोबल ट्रस्ट बँक मर्यादित यांना

वांद्रे-कुर्ला संकुलात देऊ केलेल्या भूखंडाच्या बाबतीतील सर्व कागदपत्रांचा सखोल अभ्यास करुन प्राधिकरणास अहवाल सादर करण्यासाठी खालील सदस्य असलेली समिति प्राधिकरण याद्वारे नियुक्त करीत आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | गृहनिर्माण मंत्री | - | अध्यक्ष |
| (२) | श्री.वसंत डावखरे | - | सदस्य |
| (३) | शासनाचे मुख्य सचिव | - | सदस्य |
| (४) | महानगर आयुक्त | - | सदस्य-सचिव" |

**<u>बाब क्र.८</u> : प्राधिकरणाला विश्वस्त निधी व सोसायटयांच्या मूळ रकमांमध्ये (कॉर्पस) अंशदान करता यावे यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६-अ मध्ये सुधारणा करण्याबाबत**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.७७२** :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १६ अ मध्ये बाब टिप्पणीच्या जोडपत्र-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारणा करण्याची प्राधिकरण याद्वारे राज्य शासनास विनंती करीत आहे व हा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.९ : वांद्रे-कुर्ला समुहाच्या "एच" ब्लॉकमधील माहिम निसर्ग उद्यानाची देखभाल व विकास यासाठी लागणारा निधी- कायम स्वरुपाची व्यवस्था म्हणून महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था यांच्याकडे एक समुच्चय निधी उभारण्याबाबतचा प्रस्ताव**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७७३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, कार्यकारी समितीने त्यांच्या दिनांक १२ फेब्रुवारी, १९९८ च्या ठराव क्र.७४९ नुसार केलेल्या शिफारशीप्रमाणे प्राधिकरण खालील प्रस्तावांना याद्वारे मान्यता देत आहे :-

१) बाब टिप्पणीचे परिशिष्ट म्हणून जोडलेल्या टिप्पणीच्या परिच्छेद ६ मध्ये नमुद केलेल्या रकमा १९९४-९५ ते १९९७-९८ वर्ष अखेर पर्यंत प्राधिकरणाने महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेस माहिम निसर्ग उद्यानाच्या देखभालीसाठी व व्यवस्थापनासाठी उपलब्ध करुन दिल्या होत्या/द्यावयाची आहे त्यास कार्योत्तर मंजूरी/मंजूरी देणे; आणि

२) माहिम निसर्ग उद्यानाची देखभाल, व्यवस्थापन आणि उर्वरित विकास यासाठी कायम स्वरुपाची व्यवस्था म्हणून रुपये ५ कोटी एवढया रकमेचा एक समुच्चय निधी बाब टिप्पणीचे परिशिष्ट म्हणून जोडलेल्या टिप्पणीच्या परिच्छेद ७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उभारणे; मात्र भविष्यामध्ये माहिम निसर्ग उद्यान प्राधिकरणाने/महाराष्ट्र शासनाने

त्यांच्याकडे घेतल्यास, अशात-हेने उभारलेला समुच्चय निधी मुंबई महानगर प्राधिकरणाकडे प्रत्यावर्तित होईल.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, जोपर्यंत वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे, समुच्चय निधी उभारला जात नाही तोपर्यंत माहिम निसर्ग उद्यानासाठी जरुर असलेला निधी महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेस उपलब्ध करुन देण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

## बाब क्र.१० : त्रिपक्षीय कराराअंतर्गत पवई क्षेत्र विकास योजनेमधील विकासकांनी केलेल्या विकास कामांचा अहवाल

१०.१ या विषयाच्या संदर्भात श्री.वसंत डावखरे यांचे दि.११ मार्च, १९९८ चे पत्र बैठकीसमोर ठेवण्यात आले होते. सदर पत्रात श्री.डावखरे यांनी याबाबतीत महाराष्ट्र राज्याचे महाअधिवक्ता तसेच श्री.एम.एन.चांदुरकर, मुंबई व चेन्नई (मद्रास) उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश यांचे अभिप्राय प्राप्त झाले असल्यामुळे या प्रकरणाचा निर्णय या बैठकीत घेऊन होत असलेली दिरंगाई व विकासकावरील अन्याय दुर करावा अशी विनंती केली होती.

१०.२ महाराष्ट्र राज्याचे महाअधिवक्ता तसेच मुंबई व चेन्नई (मद्रास) उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश, श्री.एम.एन.चांदुरकर यांचे याबाबतीतील अभिप्राय आणि इतर सर्व कागदपत्रांचा विचार करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७७४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, या विषयावर प्राप्त झालेल्या विधीतज्ञांच्या सर्व अभिप्रायांना अनुसरुन, (१) त्रिपक्षीय कराराअंतर्गत पवई विकास योजनेमधील काही भूभागाचे

विकासक, श्री.निरंजन हिरानंदानी यांचेकडे राहीलेल्या ४२ हेक्टर इतक्या भूभागाच्या विकसनामधील बांधकाम क्षेत्राच्या १५ टक्के इतके बांधीव क्षेत्र राज्य शासनास विकण्याबाबत आग्रह विकासकांनी खालील (२) व (३) मधील त्यांच्याबाबतीतील जबाबदारी पूर्ण केल्यावर, प्राधिकरणाने धरु नये; (२) या विकसनातून विकसकाने देऊ केलेले ३१४ गाळे (पूर्वी दिलेल्या ९६ गाळयां व्यतिरीक्त) नागरी कमाल जमीन धारणा अधिनियमांतर्गत प्रस्तावातील सदनिकांची विक्री करतेवेळी देय असलेल्या दराने पैसे देऊन ताब्यात घेण्याबाबत प्राधिकरणाने जरुर ती कार्यवाही करावी; आणि (३) त्रिपक्षीय कराराअंतर्गत केलेल्या विकसनामधील मुलभूत सेवा सुविधासकट विविध आरक्षणांचे भूखंड प्राधिकरणाने ताब्यात घेऊन ते निर्देशित संस्थांना त्या त्या आरक्षणांच्या विकसनासाठी वाटप करावे, यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यांत येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी जरुर ती सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना देत आहे."

## बाब क्र.१२ : महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकडे अल्प मुदत ठेव ठेवलेल्या रु.२०० कोटी वरील व्याजाच्या दरात कपात करण्याबाबत

या विषयावर चर्चा होऊन, बाब टिप्पणीत नमूद केलेल्या कारणासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकडे अल्पमुदत ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेवरील व्याजाचा दर

माहे एप्रिल, १९९८ पासून कमी करण्याचे मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.७७५</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, पूर्वीच्या ठरावात जरुर तेथे अंशतः फेरबदल करुन, प्राधिकरण महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकडे (महासंघ) सन १९९५-९६ सालात अल्पमुदत ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेवरील व्याजाचा दर बाब टिप्पणीत नमूद केलेल्या कारणासाठी दिनांक १ एप्रिल, १९९८ पासून, १८ टक्क्यावरुन १६ टक्केपर्यंत कमी करण्यास, खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देत आहे :-

(१) महासंघाकडे ठेवण्यात आलेली एकूण ठेव रक्कम रु.२०१.२७ कोटी (सन १९९५-९६ मधील रु.२०० कोटी व उर्वरीत रक्कम रु.१.२७ कोटी) ही रक्कम दि.३१.१०.१९९८ पर्यंत किंवा त्यापूर्वी महासंघाने परत करावी;

(२) महासंघाकडे ठेवण्यात आलेली ठेव रक्कम कधी व कशी परत करण्यात येणार आहे त्याचा सविस्तर तक्ता महासंघाने प्राधिकरणाला एका महिन्यात सादर करावा. सदर तक्यात दर्शविल्याप्रमाणे ठेवीची रक्कम परत करणे महासंघावर बंधनकारक राहील; आणि

(३) महासंघाकडे ठेवण्यात आलेली ठेव रक्कम रु.२०१.२७ कोटी याच्या वाढीव कालावधीसाठी म्हणजेच दि.३१.१०.१९९८ पर्यंत भरण्याची शासनाची संमती पणन महासंघाने मिळवून प्राधिकरणास सादर करावी."

**बाब क्र.१७ : प्राधिकरणाचे सन १९९८-९९ सालचा वार्षिक कार्य कार्यक्रम**

सन १९९८-९९ सालचा वार्षिक कार्य कार्यक्रम मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.७७६ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे (अ) बाब टिप्पणीसह सादर केलेल्या १९९८-९९ सालचा वार्षिक कार्य कार्यक्रम व १९९८-९९ सालाचा मुंबई नागरी प्रकल्प-फिरता निधीचा वार्षिक कार्य कार्यक्रम आणि महानगर योजना-फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्य कार्यक्रम संमत करीत आहे; (ब) वार्षिक कार्य कार्यक्रमात अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशिलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१८ : प्राधिकरणाचे सन १९९८-९९ सालचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक**

सन १९९८-९९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.७७७ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, महानगर प्राधिकरणाची अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा १९९८-९९ सालाचा अर्थसंकल्प आणि १९९७-९८ सालचे सुधारित अंदाज यांना

प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) नुसार मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे योजना सर्वेक्षण इत्यादी कार्यक्रम शिर्षात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी रु.१० लाखापेक्षा अधिक व्यय नसलेल्या बाबींना मंजूरी देण्याचे आणि या मर्यादेपेक्षा अधिक व्यय नसलेला व मंजूर अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचे अधिकार, अशा प्रकरणाचा अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्याच्या अटींवर कार्यकारी समितीस देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे "मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी" आणि "महानगर योजना फिरता निधी" यांचे अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे १९९८-९९ चे अर्थसंकल्पीय अंदाज व १९९७-९८ चे सुधारीत अंदाज याना मंजूरी देत आहे."

**बाब क्र.२०** : **कॅनरा बँकेस वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रामध्ये पर्यायी भूखंडाचे वाटप करण्याबाबत**

चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७७८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये मिळालेल्या तसेच याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन आणि आपल्या ठराव क्र.६२५ मध्ये बदल करुन प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला

संकुलाच्या `जी` ब्लॉकमधील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापार केंद्रामधील सी-८ या भूखंडाऐवजी देऊ केलेल्या सी-१४ या भूखंडावर त्यांना निविदेतील अटीप्रमाणे दिलेल्या ११,९०३,४२ चौ.मी. बांधकाम क्षेत्राऐवजी, त्या भूखंडावर (C-१४ वर) उपलब्ध असलेले संपूर्ण बांधकाम क्षेत्र म्हणजे १४,२६२.३० चौ.मी. बांधकाम क्षेत्र ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने, पूर्वी ठरलेल्या अटी व शर्तीवर, रु.१२५ कोटी ह्या अधिमूल्याने (जे ह्या बँकेने आधीच भरले आहे) कॅनरा बँकेस देऊ करण्यास प्राधिकरण याद्वारे प्रस्ताविल्याप्रमाणे मान्यता देत आहे, मात्र ही सवलत सदर बँक आणाखी सवलत मागणार नाही या अटीच्या अधीन राहून प्राधिकरण देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, ह्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास तसेच वाटपग्राहींबरोबर करावयाच्या भाडेपट्टा करारामध्ये आणि भाडेपट्टयाच्या विलेखामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

## <u>बाब क्र.२१</u> : मुंबई महानगर प्रदेशातील रस्त्यांची सुधारणा <u>उप-प्रकल्प पाच-अ व पाच-ब</u>

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.७७९</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१-अ अनुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन, बाब टिप्पणीमध्ये समाविष्ट केलेल्या मुंबई महानगर प्रदेशातील (महापालिका क्षेत्रांबाहेरील) रस्त्यांच्या मुलभूत सोयीमध्ये सुधारणा करण्याविषयीचे उपप्रकल्प पाच-अ व पाच-ब हाती घेण्यास आणि प्रस्तावित केल्याप्रमाणे

अंमलबजावणीसाठी जबाबदार असलेल्या स्थानिक प्राधिकरणांना नवीनतम अंदाजित खर्चाच्या ७५% पर्यंतचे अनुदान सहाय्य प्राधिकरणाच्या निधीमधून देण्यास, प्राधिकरण प्रस्ताविल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्तांना योग्य वाटतील अशा अटी व शर्तींच्या अधीन, याबाबतीत आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास आणि सर्वसाधारण मान्यता देण्यास तसेच वेळोवेळी अनुदान देण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२२ : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास मुंबई-पुणे द्रुत-गती मार्गाच्या बांधकामासाठी देण्यात येणारे कर्ज रु.२२३ कोटी मधील अटी व शर्ती शिथील करण्याबाबत**

२२.१ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (रस्ते विकास महामंडळ) यांचेकडून प्राप्त झालेल्या दि.३ मार्च १९९८ चे पत्र क्र.एमएसआरडीसी/एलटीडी/३०८ आणि दि.७ मार्च, १९९८ चे पत्र (फॅक्स) क्र.६४००३०६/६५१२७८८ मध्ये विषयांकीत कामासाठी प्राधिकरणाकडून द्यावयाच्या रु.२२३ कोटी कर्जाच्या अटी व शर्ती शिथिल कराव्या अशी विनंती करण्यात आली होती. त्याचा विचार करुन प्राधिकरणाने खालील प्रमाणे बदल करण्याचे ठरविले : -

(१) वित्तिय संस्था व कर्ज रोखेधारक यांचेमध्ये विश्वास तयार करण्यासाठी महानगर प्राधिकरणाकडून देण्यात येणारे कर्ज हे दुय्यम कर्ज समजावे अशी रस्ते विकास महामंडळाने केलेली विनंती मान्य करण्यात आली.

(२) प्राधिकरणाकडून घेण्यात येणा-या कर्जासाठी रस्ते विकास महामंडळाने शासनाची हमी देणे आवश्यक आहे. शासनाच्या हमीसाठी भरावे लागणारे २ टक्के इतके हमी शुल्क जरुर पडल्यास प्राधिकरण महामंडळास कर्ज रुपाने देईल. त्याबाबतच्या अटी व शर्ती मुळ कर्जाच्या अटी व शर्तीसारख्या रहातील.

(३) रस्ते विकास महामंडळाने पुणे मुंबई व मुंबईतील उड्डाण पुल याकरीता प्राधिकरणाकडून घेण्यात आलेल्या कर्जाची परतफेड एकूण चौदा वर्षात (४ वर्षाचा प्रदान-विलंबन कालावधी अधिक १० वर्षे कर्ज व व्याज परतफेडीचा कालावधी) करणे आवश्यक आहे. रस्ते विकास महामंडळाने कर्ज घेतलेल्या दिनांकाच्या पाचव्या वर्षापासून (विलंबन कालावधी संपल्यानंतर) कर्जाची रक्कम १० वर्षामध्ये भांडवलीकृत व्याजासह समप्रमाणात प्राधिकरणाला परत करणे आवश्यक आहे. रस्ते विकास महामंडळाने कर्ज घेतलेल्या तारखेपासून ४ वर्षानंतर कर्ज/व्याजाची परतफेड करण्याची सुरुवात न केल्यास रस्ते विकास महामंडळ- निलंब लेखा खाते (Escrow account) उघडणे बंधनकारक राहील व दुय्यम कर्ज म्हणून देण्यात आलेली (subordinate debt.) कर्जाची रक्कम वसूल करण्याचा अधिकार प्राधिकरणास राहिल.

(४) प्राधिकरणाने या अगोदर रस्ते विकास महामंडळाकडे ठेवलेली ठेव रक्कम रु.१०० कोटीचे धनादेश देण्याच्या तारखेपासून कर्जात रुपांतरीत करण्यात येईल, रु.१०० कोटी ठेव रकमेपैकी रु.५० कोटी रक्कम पुणे मुंबई द्रूतमार्गासाठी व रु.५० कोटी रक्कम मुंबई येथील उड्डाण पुल व इतर विकास कामांकरीता आगाऊ म्हणून हस्तांतरीत करण्यात आली असे समजण्यात येईल. कर्जाच्या हप्त्याची पुढील रक्कम प्रत्यक्ष खर्चाच्या प्रतीपूर्ती करण्याच्या आधारावर अवलंबून असेल. ही प्रतीपूर्ती प्राधिकरणाच्या गुंतवणूक जेव्हा परिमित होतील, त्याप्रमाणे करण्यात येईल.

(५) रस्ते विकास महामंडळाने प्राधिकरणाकडे एकूण रु.५४८ कोटी (रु.२२३ कोटी पुणे व मुंबई द्रूतगती मार्गासाठी व रु.३२५ कोटी उड्डाण पुलासाठी) अशी मागणी केलेली आहे. हे कर्ज दि.६ ऑक्टोबर, १९९५ चा महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.पीएसयु-११९५/ सीआर-३/पीएसयु मधील अटी व शर्ती शिथील करण्याच्या अधीन राहून देण्यात येईल.

(६) वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त, प्राधिकरणाच्या दि.२७ नोव्हेंबर, १९९७ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावानुसार बाकी अटी व शर्ती असतील.

२२.२ त्यानंतर प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.७८०</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (रस्ते विकास महामंडळ) यांचेकडून प्राप्त झालेल्या दि.३ मार्च, १९९८ व ७ मार्च, १९९८ च्या पत्रांचा विचार करुन, प्राधिकरण याद्वारे त्यांच्या दि.२७ नोव्हेंबर, १९९७ च्या ठराव क्र.७४५ मध्ये या कार्यवृत्ताच्या परिच्छेद २२.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बदल करण्यास, प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, विषयांकीत कर्ज व मुंबई महानगर प्रदेशातील द्रुत महामार्गावरील उड्डाणपूल व रुंदीकरणासाठी रु.३२५.३८ कोटीचे आणखी कर्ज देणे शक्य व्हावे म्हणून दि.६ ऑक्टोबर, १९९५ च्या महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.पीएसयु-११९५/सीआर-३/पीएसयु मध्ये जरुर असलेले बदल करण्याची विनंती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी राज्य शासनास करुन नियमात सुट मिळवावी म्हणजे प्राधिकरणास रस्ते विकास महामंडळास एकूण अंदाजे रु.५४८ कोटी इतके कर्ज देता येईल."

**<u>बाब क्र.२३</u> :** **द्रुत महामार्गाच्या आणि मुंबई महानगर प्रदेशातील मुख्य रस्त्याच्या दर्जात वाढ करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी - महाराष्ट्र राज्य <u>रस्ते विकास महामंडळाला कर्ज देणे</u>**

२३.१ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.४ सप्टेंबर, १९९७ चा निर्णय क्र.बीआरडी-१०९७(१)-रस्ते-६ व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (रस्ते विकास महामंडळ) प्राप्त झालेले त्यांचे दिनांक २७ ऑगस्ट, १९९७ मध्ये विषयांकीत कर्जाची रक्कम राज याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी रस्ते विकास महामंडळास द्यावी अशी सूचना/विनंती करण्यात आली होती. त्यावर विचार करुन प्राधिकरणाने त्यांच्या दि.२८ नोव्हेंबर, १९९६ च्या ठराव क्र.३२५ मध्ये या कार्यवृत्ताच्या प.२२.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बदल करण्याचे व कर्ज सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी महामंडळास देण्याचे ठरविले व त्याप्रमाणे खालील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.७८१</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, या कार्यवृत्ताच्या प.२३.१ मध्ये नमूद केलेला राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचा निर्णय व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (रस्ते विकास महामंडळ) यांचे पत्र यामध्ये करण्यात आलेली सूचना/विनंती यांचा विचार करुन, प्राधिकरण याद्वारे त्यांच्या दि.२८ नोव्हेंबर, १९९६ च्या ठराव क्र.७०४ प्रमाणे मंजूर केलेल्या रु.३२५.३८ कोटीपैकी फक्त उड्डाणपुलासाठी रु.३०२ कोटीच्या कर्जाच्या अटी व शर्तीमध्ये या कार्यवृत्ताच्या प.२२.१ मध्ये नमूद केलेले बदल करुन तसेच कर्जाचा कालावधी १० वर्षाऐवजी १४वर्षे (४वर्षाचा विलंबन कालावधी अधीन १० वर्षे कर्ज व परतफेडीचा कालावधी) करण्यास व कर्जाची परतफेड या

कार्यवृत्ताच्या प.२२.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यास आणि ते कर्ज सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी रस्ते विकास महामंडळास देण्यास याद्वारे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, विषयांकीत कर्ज व रस्ते विकास महामंडळास मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या बांधकामासाठी द्यावयाचे आणखी रु.२२३ कोटीचे कर्ज देणे शक्य व्हावे म्हणून दि.६ ऑक्टोबर, १९९५ च्या महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.पीएसयु-११९५/सीआर-३/पीएसयु मध्ये जरुर असलेले बदल करण्याची विनंती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यानी राज्य शासनास करुन नियमात सुट मिळवावी म्हणजे प्राधिकरणास रस्ते विकास महामंडळास एकूण अंदाजे रु.५४८ कोटी इतके कर्ज देता येईल."

**बाब क्र.२४ : दादर (पश्चिम) येथील क्रांतीसिंह नाना पाटील मंडईचा पुनर्विकास करण्यासाठी रु.२९.१० कोटी कर्ज बृहन्मुंबई महानगर पालिकेस देण्याबाबत**

२४.१ या विषयावर झालेल्या चर्चेत खाली नमूद केलेले मुद्दे मांडण्यात आले :-

(१) फेरीवाल्यांचे पुनर्वसन करुन रस्ते व पदपथ, वहाने व पादचारी याना खुले करण्याच्या उद्देशाने संदर्भित प्रकल्प राबविण्याचे ठरविले आहे व हा प्रारंभिक प्रकल्प यशस्वी झाल्यास अशाप्रकारचे आणखी प्रकल्प राबविता येतील.

(२) हा प्रकल्प फेरीवाल्यांचे पुनर्वसनासाठी असल्यामुळे प्रारंभी जरुर असलेला निधी कर्जरुपाने उभारावा लागणार आहे व हे कर्ज शक्यतो बिनव्याजी किंवा नाममात्र व्याजाने मिळण्यावरही प्रकल्पाची यशस्वीता अवलंबून आहे. तसेच प्रकल्प ठरविलेल्या वेळेत पूर्ण करणेही जरुरीचे आहे.

(३) महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्रकल्पाचा पहिला टप्पा ११ महिन्यांत पूर्ण करण्यात येईल, तसेच सदर कर्ज घेतल्यापासून ४ थ्या वर्षाच्या शेवटी कर्जाची परतफेड ३ हप्त्यात करण्यात येईल म्हणजे ६ व्या वर्षाच्या शेवटी संपूर्ण कर्जफेड करण्यात येईल असे सांगितले.

(४) ह्या प्रारंभिक प्रकल्पास प्राधिकरणाने जरुर असलेले रु.२९.१० कोटीचे कर्ज बिनव्याजी द्यावे.

२४.२ यावरील चर्चेच्या शेवटी रु.२९.१० कोटीचे कर्ज प्राधिकरणाने बिनव्याजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस विषयांकीत प्रकल्पासाठी उपलब्ध करुन द्यावे असे ठरले. तसेच कर्जाच्या १० टक्के रक्कम कर्जाचा करार पूर्ण केल्यावर आगाऊ द्यावी व उरलेली रक्कम ही प्रकल्पाच्या प्रगतीनुसार खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या स्वरुपात हप्त्यामध्ये द्यावी असे ठरले. मात्र ठरविल्याप्रमाणे प्रकल्पाचा पहिला टप्पा ११ महिन्यात पुरा न झाल्यास त्यानंतर द्यावयाच्या कर्ज भागावर ११ टक्के दराने व्याज आकारावे असेही ठरले.

२४.३ वरील निर्णयानुसार प्राधिकरणाने खालील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.७८२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, दादर (पश्चिम) येथील क्रांतीसिंह नाना पाटील मंडईचा पुनर्विकास करण्यासाठी रु.२९.१० कोटी इतके कर्ज खालील अटी व शर्तीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यास प्राधिकरण हयाद्वारे मान्यता देत आहे :-

(१) कर्जाची रु.२९.१० कोटीची रक्कम प्रकल्पाच्या प्रगतीनुसार खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या स्वरुपात हप्त्यांमध्ये वितरित करण्यात यावी. आवश्यक असल्यास सुरुवातीला कर्जाच्या १०% रक्कम कर्जाचा करार झाल्यावर आगाऊ देण्यात यावी.

(२) प्रकल्पाचा पहिला टप्पा ठरविल्याप्रमाणे महानगरपालिकेने ११ महिन्यात पूर्ण केला पाहिजे व त्या काळात देण्यात येणाऱ्या कर्जाच्या रकमेवर व्याज आकारले जाणार नाही. मात्र पहिला टप्पा ११ महिन्याच्या ठरविलेल्या कालावधीत पूर्ण न झाल्यास त्यापुढे दिल्या जाणाऱ्या कर्जावर वार्षिक ११% एवढे व्याज प्राधिकरण आकारील. अशा व्याजाचे कर्जाची परतफेड सुरु होण्यापर्यंतच्या कालावधील मुद्दलात रुपांतर करण्यात येईल.

(३) महानगरपालिकेने कर्जाची रक्कम, व्याज लागु केल्यास अशा व्याजासह, कर्जाचा पहिला हप्ता किंवा आगाऊ रक्कम मिळाल्यापासून ४ थ्या वर्षाच्या शेवटी तीन समान वार्षिक हप्त्यात फेडावी.

(४) सदरहू कर्जासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, मधील तरतूदीनुसार शासनाची संमती घ्यावी व कर्जासाठी प्राधिकरणाशी योग्य करार करावा.

(५) महानगरपालिकेने या प्रकल्पाच्या दोन्ही टप्प्यांचा तपशीलवार प्रकल्प अहवाल प्राधिकरणास उपलब्ध करुन द्यावा व त्यानंतर प्राधिकरणाकडून कर्जाचा पहिला हप्ता वितरित करण्यात येईल.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, महानगरपालिकेशी यासंबंधी योग्य करार करण्यास व त्यासंबंधीची इतर सर्व कार्यवाही करण्यास प्राधिकरण ह्याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

वेळेअभावी बाब क्र.११, १३ ते १६ व १९ यावर विचार करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.